अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/२२२७

दिनांक :- ०८/०७/२०२०

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील मुख्याध्यापक व उप शिक्षकांना क्षेत्रिय कार्यालयनिहाय उपलब्ध करून देणेबाबत

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/१९८२ दि.२८/०६/२०२०

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे.त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळ्या स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

त्यानुसार शिक्षण विभाग (प्राथमिक)कडील मुख्याध्यापक व उपशिक्षकांना सोबत जोडलेल्या यादीनुसार १५ क्षेत्रीय कार्यालय निहाय( नियंत्रण कक्ष, डाटा एन्ट्रीचे व इतर तदनुषंगिक कामकाजाकरिता )उपलब्ध करून देण्यात येत आहे. सबंधित कर्मचारी यांनी क्षेत्रीय कार्यालय,सहाय्यक महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.

सदर कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणाऱ्या,हलगर्जीपणा करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सबंधित सहाय्यक महापालिका आयुक्त यांनी त्यांचे अधिनस्त कोरोना विषाणू आजाराच्या कामकाजाबाबत सदर कर्मचाऱ्यांचे आदेश आपले स्तरावरून प्रसृत करावेत.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहेत.तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल सबंधित क्षेत्रीय कार्यालयाने उप आयुक्त (सामान्य प्रशासन)यांचेकडे सादर करावेत.

8/7/2020

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि/इ) यांना माहितीस्तव.
प्रती – १) महापालिका सहाय्यक आयुक्त(सर्व क्षेत्रीय कार्यालय),
२)प्रशासकीय अधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग ,पुणे महानगरपालिका